राज्यातील विविध माथाडी मंडळ/ सुरक्षा
रक्षक मंडळांमध्ये अनुकंपा तत्त्वावर कर्मचारी
नियुक्तीबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः युडब्ल्यूए-१५११/प्र.क्र.२७३२/ कामगार-५**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १८ एप्रिल, २०१३

**वाचा -**

१) **शासन निर्णय क्रमांकः अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दि.२२/०८/२००५**
२) **शासन निर्णय क्रमांकः अकंपा-१०१०/प्र.क्र.३०८/१०/आठ, दि.०६/१२/२०१०**

**प्रस्तावना -**

राज्यातील विविध माथाडी/ सुरक्षा रक्षक मंडुळामध्ये काम करणारा कर्मचारी मृत्यू पावल्यास/ कायमचे अपंगत्व आल्यास/ काम करण्यास सक्षम नसल्यास त्यांच्या जागेवर त्यांच्या वारसांना मंडळात अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याकरीता कामगार आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त होणारे विनंतीअर्ज शासन मंजूरीकरीता वेळोवेळी शासनास सादर केले जातात व या प्रक्रीयेमध्ये बराच कालावधी लागतो. त्यामुळे अशा प्रकरणी होणारा विलंब टाळण्यासाठी विविध माथाडी/ सुरक्षा रक्षक मंडळातील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या जागी त्यांच्या पात्र वारसांची अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करण्याबाबत शासनस्तरावर सर्वंकष विचार होवून आता याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

माथाडी/ सुरक्षा रक्षक अधिनियम व त्या अंतर्गत योजनेतील तरतुदीनुसार मंडळातील माथाडी/ सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांसाठी "मंडळ" हे नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यामुळे अनुकंपा नियुक्तीसंदर्भातील उपरोक्त शासन निर्णयांच्या आधारे राज्यातील विविध माथाडी/ सुरक्षा रक्षक मंडळांना अनुकंपा नियुक्तीची योजना या शासन निर्णयान्वये लागू करण्यात येत आहे. माथाडी/ सुरक्षा रक्षक मंडळातील गट "क" व "ड" पदावरील नियमित कर्मचारी सेवेत असताना दिवंगत झाल्यास त्यांच्या कुटुंबातील पात्र व्यक्तीला खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुकंपा नियुक्ती देण्यात येईल :-

१. सदर योजनेअंतर्गत फक्त "क" व "ड" वर्गातील रिक्त पदांसाठी विहीत अटी व शर्ती तसेच आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या कुटुंबातील एका पात्र व्यक्तीस अनुकंपा नियुक्ती देण्यात येईल.
२. अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबियांनी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे (मंडळाकडे) अर्ज करताना कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत करणे आवश्यक राहील.

३. अनुकंपा नियुक्तीसाठी मंडळाकडे प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या एकापेक्षा जास्त असल्यास, मंडळास त्यासाठी अर्ज प्राप्त झालेल्या क्रमानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

४. दिवंगत कर्मचाऱ्याच्या पात्र कुटुंबियास अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

५. अनुकंपा तत्त्वावर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना टंकलेखनाचे विहीत वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठीची तसेच संगणकाची (MS-CIT) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीची मुदत नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने इतकी राहील.

६. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/करण्यात येणाऱ्या आदेशातील अटी व सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे तसेच अनुकंपा नियुक्तीसंदर्भातील अटी व शर्तीमध्ये बदल झाल्यास त्यानुसार कार्यवाही करणे मंडळांना बंधनकारक राहील.

२. वरील अटी व शर्तीनुसार सर्व माथाडी/ सुरक्षा रक्षक मंडळांनी त्यांच्या मंडळांतर्गत अनुकंपा नियुक्तीबाबतचे प्रस्ताव कामगार आयुक्त, मुंबई यांच्या मान्यतेने अंतिम करावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०४१८१६५५४२८११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Kisanrao Gawade

Digitally signed by Subhash Kisanrao Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy & Labor, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Subhash Kisanrao Gawade
Date: 2013.04.23 16:29:40 -07'00'

(सु. कि. गावडे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक.
४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सह आयुक्त (माथाडी), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मंबई आणि ठाणे/ नाशिक/ नागपूर/ औरंगाबाद/ पुणे/ रायगड.

७. अध्यक्ष, सर्व जिल्हास्तरीय माथाडी मंडळे.
८. निवडनस्ती, कामगार-५, उ.ऊ.व का.वि., मंत्रालय, मुंबई-३२.